# —: प्रेसनोट :—

दिनांक :— ३०/०३/२०२२

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गु.नों.क्र. | २१/२०२२ |
| कलम | ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ |
| आरोपी व कार्यालयाचा पत्ता. | श्री. नितीन अर्जुनराव बागल, वय ४८ वर्षे, धंदा— नोकरी (पद—सहाय्यक राज्यकर आयुक्त, वस्तू व सेवाकर विभाग, माझगाव मुंबई — १०) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. ३०,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रू. २५,०००/— |
| थोडक्यात हकिकत | यातील फिर्यादी हे कॅन्ट्रॉनिक्स (इंडिया) या कंपनीचे प्रोपरायटर असून सदरचा व्यवसाय हा एमएसएमई ॲक्ट आणि जीएसटी ॲक्ट अंतर्गत नोंदणीकृत आहे. लोकसेवक हे असिस्टंट कमिशनर ऑफ स्टेट टॅक्स असून त्यांनी तक्रारदार यांनी त्यांचे कंपनीचे एका ठराविक विक्री संदर्भातील सन २०१६—१७ या वर्षाचे सी फॉर्म लोकसेवक यांच्या कार्यालयामध्ये जमा न केल्यामुळे त्यांनी सदर बाबत तक्रारदार यांच्या कंपनीकडून रू. १,६८,८३८/— इतका भरणा करणे बाकी असल्याचा अंतिम मुल्यांकन आदेश काढला होता.<br>नमूद आदेशाच्या अनुषंगाने फिर्यादी यांना संबंधित कंपनीकडून सी फॉर्म उशिराने प्राप्त झाल्यामुळे त्याबाबत जानेवारी—२०२२ मध्ये ऑनलाईन रेक्टीफिकेशन ॲप्लीकेशन लोकसेवक यांच्या कार्यालयाला केलेले आहे. नमूद अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक कागदपत्रे व सी फॉर्म जमा करणेकरिता तक्रारदार यांच्या कंपनीचे सीए हे लोकसेवक यांच्या कार्यालयात गेले असता, त्यांनी सदरची सर्व कागदपत्रे स्विकारण्यास नकार देवून रू. ३०,०००/— इतक्या लाचेची मागणी केली. सदर बाबत सीए यांनी फिर्यादी यांना सांगितले. त्यानुसार फिर्यादी यांनी लोकसेवक यांची प्रत्यक्ष भेट घेतली असता त्यांनी फिर्यादी यांच्याकडे देखील रू. ३०,०००/— इतक्या लाचेची मागणी केली.<br>परंतु फिर्यादी यांची लोकसवेकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग या कार्यालयास लेखी तक्रार दिली. फिर्यादीचे तक्रारीवरून पडताळणी करण्यात आली. पडताळणी दरम्यान तडजोडी अंती लोकसेवक यांनी रू. २५,०००/— रक्कमेची लाचेची मागणी करून ती स्विकारण्याचे कबुल केले. त्याप्रमाणे रचण्यात आलेल्या सापळा कारवाईमध्ये लोकसेवक यांनी फिर्यादी यांचेकडून लाचेची रक्कम रू. २५,०००/— स्विकारताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले म्हणून वर नमूद आरोपी लोकसेवक यांचे विरूदध कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्ट्राचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग,९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२,
फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,
वेबसाईट—acbmaharashtra.gov.in,
ईमेल acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक www.facebook.com - Maharashtra ACB.
मोबाईलॲप www.acbmaharashtra.net

ASSTT. COMMISSIONER OF POLICE ANTI-CORRUPTION BUREAU MUMBAI

(नितीन दळवी)
सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई